महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०१/२०१७

**१) संगनमत करुन जुन्या वैमन्यस्यावरुन हतकडीने कानावर मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०१/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हे आपल्या सोबतचे पोलीस कर्मचाऱ्यासह सोनी हत्याकांडातील ०७ अआरोपीतांना सत्र न्यायालय भंडारा चे आदेशावरुन पेशी तारखेवर हजर करुन परत जिल्हा कारागृह भंडारा येथे दाखल करीत असतांना यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन पोलीस व्हॅन मधुन खाली उतरत असतांना जुन्या वैमन्यस्यावरुन पिडीत आरोपी रा. कारागृह भंडारा यास हतकडीने कानावर मारुन व लाथाबुक्यांने मारुन जखमी केल्याने जखमीचे एमएलसी रिपोर्ट व सरतर्फे फिर्यादी पोहवा. शेख पोलीस मुख्यालय भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु . :–**

दिंनाक २२/०१/२०१७ रोजी १५.०० वा. दरम्यान यातील मृतक शैलेश दिलीप बांभरे वय २५ वर्ष, रा. उमरी याचे दिपाली बोकर हिचे सोबत प्रेमसंबध होते व त्याची माहीती मृतकाच्या पत्नीस होती त्यावरुन त्यांचेमध्ये वारवांर भांडण होत होते. दिनांक २२/०१/२०१७ रोजी यातील मृतक याने त्याची प्रेमीका दिपाली सोबत मोबाईवर बोलुन त्याच्या घरी असलेली उंदीर मारण्याची विषारी औषध घेतल्याने त्यास उपचारा करीता सामान्य रुग्णालय व तेथुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दिनांक २४/०१/२०१७ ला उपचारा दरम्यान दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला आवक क्र. १०५/१७ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे पोना. पडाल यांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कागदपत्र आणुन पेश केल्याने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहे.

**३) आजाराला कंटाळुन विहीरीच्या पाण्यात बुडुन महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक २५/०१/२०१७ रोजी ०५.०० ते ०८.२० वा. पुर्वी. यातील मृतक कमलाबाई यादव कावळे वय ८० वर्ष, रा. पद्मा वार्ड पवनी हिला २० वर्षापुर्वी पासुन कबरदुखी, गुडघ्याचा त्रास असुन डॉक्टरानकडुन औषधोउपचार सुरु होता. नेहमी प्रमाणे सकाळी व्यायाम करण्यास, फिरण्यास डॉक्टरांच्या सल्याने जात होती. रोजच्याप्रमाणे फिरण्यासाठी गेली तिने बिमारीच्या त्रासाने मनावर परीणाम घेवुन विहीरीच्या पाण्यात उडी घेवुन पाण्यात बुडुण मरण पावल्याने फिर्यादी मनोहर यादव कावळे रा पद्मा वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.